# सुधा मूर्ती यांच्या अनुवादित कादंब—यांतील समाजजीवन

**मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. मंजुषा डी. समर्थ**
**आर्ट्स कॉलेज, सिहोरा, जिल्हा भंडारा**

**संशोधक विद्यार्थी**
**कैलाश एस. पात्रीकर**
**पी.जी.टी.डी. ऑफ मराठी**
**रा.तु.म.नागपूर, विद्यापीठ, नागपूर**

---

**प्रस्तावना :**

मानव हा सामाजिक प्राणी आहे. याचा साधा अर्थ असा की माणूस एकटयाने जीवन जगू शकत नाही. तो गटागटाने राहतो. अनेक कुटुंबाचा मिळून गट होतो, तर अनेक व्यक्ती मिळून कुटुंब होते. ही सर्व रचना समाज म्हणून ओळखली जाते. त्यातूनच व्यक्ती, कुटुंब आणि समाज यातील नाते संबंध निर्माण होतात, हे नाते संबंध जितके निरोगी व निकोप, तितका तो समाजही निकोप व प्रगल्भ होतो, समाज जीवनाचे समान मनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटलेले असते. किंबहुना साहित्यात समाजाचा चेहरा दिसणे स्वाभाविकच आहे. साहित्य प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष पणे समाजावर काही संस्कार करीत असते. कधी ते ऐकीव स्वरूपाचे, मौखिक स्वरूपाचे असेल. हे माणसाच्या लहानपणापासून घडत असते. मग हे साहित्य धार्मिक, सामाजिक, राजकिय, वैचारिक स्वरूपाचे असू शकते. म्हणजेच साहित्य आणि समाज यांचे अद्वैत नाते आहे. साहित्यामुळे समाज घडतो, पण हे साहित्य समाजाचेच देणे असते. हे ही स्विकारणे योग्यच ठरेल.

साहित्याचा मुलाधार मानवी जीवन आणि त्याचा समाज हाच असतो. समाज जीवना व्यतिरिक्त साहित्याची आपण कल्पनाचं करू शकत नाही. कोणतिही चांगली, दर्जेदार साहित्यकृती नुसत्या कल्पनेवर निर्माण करता येत नाही. साहित्य कृतीचा गाभा किंवा केंद्र हा माणूस व त्याचे जगणे हाच असतो. साहित्य हे अनेक चौकटी मोडणारे प्रभावी शस्त्र आहे, म्हणून साहित्यातून समाजाचा अंतस्वर उमटले पाहिजे. समाजाचे वैचारिक, मानसिक, सांस्कृतिक पोषण करण्याचे कार्य साहित्यातून होत असते. समाजाचे सर्वांगींण पोषण करणे, सामाजिक संवेदना टिकविण्याचे कार्य साहित्य करित नसेल तर, त्याचे मूल्य शुन्यवत मानले पाहिजे. जीवनातील भग्नता, रूक्षता, भीती कमी करून आनंदाचा झरा निर्माण करणे हे साहित्याचे प्रयोजन असले पाहिजे. मानवतेच्या प्रगतीसाठी सामाजिक चेतना निर्माण करणे हे कार्य साहित्याने करणे आवश्यक आहे. याच दृष्टिकोनातून सुधा मूर्ती यांच्या अनुवादित कादंबरीतील समाजजीवनाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**सुधा मूर्ती यांच्या कादंबरीतील समाजजीवन :**

'अस्तित्व' या कादंबरीत तत्कालीन समाजजीवनात मुलगी होण कमीपणाचे समजले जायचे हे कृष्णरावाची आई सुंदरम्माच्या वर्तणूकीतून दिसून येते.(पृ.क्र.२५) जालन्यातील रेल्वे चाळीचे वर्णन करतांना लेखिका सांगतात. ती एक छोटीशी चाळ होती. दोन खोल्याचे घर त्यात छोटेसेच स्वयंपाक घर, अख्या चाळीत पिण्याच्या पाण्याचा एकच नळ त्यात पुष्कळ कुटुंबे होती. ही कुंटुंबे वेगवेगळया राज्यातून (पृ.क्र.२७) आलेली असली तरी व्यवहाराची भाषा हिंदी होती. रेल्वे कॉलनीच्या मागच्या बाजुला एक पंजाबी कुटुंब राहत होते. पाणी आणण्याच्या निमित्ताने सुमती व रूपिंदरची मैत्री होते. या कॉलनीतली माणसे तशी कुणालाच विशेष सामावून घेणारी नव्हती जन्मापासून मुन्नाच्या तळपायावर तीळ होता. अशी मुले ही अवलक्षणी असतात.

ही कुठे गेली तरी नुकसान करणारी असतात. म्हणून रूपिंदर वगळता कुटुंबातील सर्व मंडळी त्याचा तिरस्कार करतांना दिसतात. मुन्नाला प्रेम, आपुलकी मिळावी म्हणून सुमती व रावसाहेब त्याला स्विकारतात व स्वत:च्या मुलाप्रमानेचं उच्च शिक्षण देतात. अमेरिकेतील समाज जीवनाचे वर्णन करतांना लेखिका सांगतात. तिथे शेतीच्या कामासाठी शेतमजुर म्हणून रेड इंडियन्स लोकांना मजुरीवर बोलवतात. तेथील समाजजीवनात शेतीचे काम हे निष्कृट दर्जाचे समाजण्यात येते.

'डॉलर बहू' या कादंबरीच्या प्रारंभी कर्नाटकातील धारवाडमधील समाज जीवनाचे वर्णन येते. विनिता हे पात्र अनाथ असून तिचे काका भीमण्णा किरकोळ शेती करून तिचा सांभाळ करतात. एकूण पाहता आर्थिक दृष्ट्या त्याचं घर सर्वसामान्य म्हटल पाहिजे (पृ.क्र.११) शामण्णा हे संस्कृतचे मास्तर असून चंद्रशेखर, गिरीश आणि सुरभी ही तीन मुलं. नव—याच्या पगारात घराचं बांधकाम करण्याइतकी अनुकूलता गौरम्मांना मिळाली नव्हती. मोजका पगार, मुलांचे शिक्षण, वरकमाई नाही अशा परिस्थितीत गौरम्मा मनातील स्वप्न बाजुला सारून काटकसरीनं संसार करत होत्या (पृ.क्र.१७) विनितेचं लग्न गिरीशशी झाल्यानंतर तिची सासू गौरम्मा तिच्याशी चांगला व्यवहार करते. पण चंद्रूच लग्न झाल्यानंतर श्रीमंत घरातून आलेल्या जमुनेचं ती सदासर्वदा कौतुक करते. आणि गरीब घरातून आलेल्या विनितेचा तिरस्कार करते. इथल्या समाजजीवनात कुंडली, पत्रिकेला विशेष महत्त्व दिले जाते म्हणूनचं गौरम्मा सुरभीच्या पत्रिके प्रमाणे सासू नसलेल स्थळ शोधते. (पृ.क्र.५४)

या कादंबरीत अमेरिकेतील समाजजीवनाचे वर्णन लेखिका करतांना दिसतात. अमेरिकेत राहणारे भारतीय सगळे सण, उत्सव वीकएंडलाचं साजरे करतात. भारताप्रमाणे इथे कामाला माणसे मिळत नाहीत त्यामुळे परिवारातील कामे स्त्री—पुरूष मिळून करतांना दिसून येतात. इथे सगळे खाद्यपदार्थ रेस्टॉरेंटमधून खरेदी करून आणले जाते. मुलांना पूर्णपणे स्वतंत्र दिले जाते. आई—वडीलांनी मुलालं छळलं तर मुल पोलिसात तक्रार देतात (पृ.क्र.१२१) तिथे जाती, भाषा यांचे राजकारण नाही.

'महाश्वेता' या कांदबरीतील शामण्णा मास्तराची परिस्थिती गरीबीची असून त्याला तीन मुली आहेत. कुटुंबाचे उदरनिर्वाह व्हावे म्हणून तो शिकवणी वर्ग घेतो. ती मुलं ही काही वेळा पैसे द्यायची, त्याचबरोबर घरचे नारळ, धान्य, भाजी—पाला, शेंगा वगैरे स्वरूपात काही ना काही द्यायची. केवळ पगारावर संसार चालवण अशक्य होत. राधाक्का गोपालरावांच्या धर्मपत्नी त्याच्या घराण्यात पिढयानुपिढयाची श्रीमंती एकवटली होती. शेकडो एकर शेत, मळे, लोखंडी तिजोरीत असलेले मणभर सोन्याचे दागिने यामुळे हे घराणंच लक्ष्मीपुत्रांचचं झालं होत. राधाक्कांचा रूढी—धर्मावर अपार विश्वास होता. पत्रिकेत छत्तीस पैकी छत्तीस गुण जुळतात म्हणून आनंदच्या लग्नासाठी गरीब कुटुंबातील अनुपमेचा त्या स्विकार करतात. अनुपमाच्या पायावर कोडाचा डाग आल्याने त्या अभ्रदाला घाबरून, किळसून, आमची फसवणूक केली असा आरोप करून तिला माहेरी हाकळून देण्यात येते वर धमकी ही दिली जाते. जो वर हा डाग सुधारत नाही तो वर या घरात पाऊल ठेवायच नाही. विवाहीत मुलगी कारणाशिवाय माहेरी फार दिवस राहिली, की समाजात बोलणा—यांच्या हाती माईक दिल्यागत. तशीचं तिची गत झाली. गावात तिच्या डागाविषयी वेगवेगळया अफवाना उधाण आल. तिच्या सावत्र बहिणीचं जुळलेल लग्न अनुपमेच्या डागामुळेचं तुटले म्हणून तिची सावत्र आई तिचा तिरस्कार करते. आपल्या प्रत्यक्ष जन्मदात्याला आपलं अस्तित्व शापासारखं वाटत हे ऐकून अनुपमेचं अंत:करण रक्तबंबाळ होते. ग्रामिण समाजजीवनात माहेरी—सासरी मिळालेल्या वागणूकीलं कंटाळून ती मुंबईला येते.

मुंबईतील समाज जीवनात मात्र तिला अशी वागणूक मिळत नाही. ऑफीसमध्ये काम करतांनी सगळेचं तिला सहकार्य करतात. डॉली ही ख्रिश्चन असूनही तिला महत्त्वपूर्ण सहकार्य करते तिला राहण्यासाठी घर देते. कोडाचं डाग असूनही जात–पात–धर्म यांचा विचार न करता डॉ. वसंत तिला लग्नाची मागणी घालतो. पण ती नितळ मैत्री स्विकारते.

'बकुळा' या कादंबरीत तुंगभद्रा नदीने कर्नाटक राज्याचे दोन भाग झाल्याचे वर्णन केलेले आहे. तुंगभद्रेच्या दक्षिणेला दक्षिण कर्नाटक तर उत्तरेला महाराष्ट्र राज्याच्या सरहद्दीपर्यंत पसरलेल्या प्रदेशाला उत्तर कर्नाटक म्हटले गेलेले आहे. या दोन्ही प्रदेशातील लोकांचे रीतीरिवाज, वेशभूषा, रूढी आणि परंपरा, खाण्यापिण्याच्या पद्धती आणि जीवन विषयक दृष्टिकोन या सर्वच बाबतीत भिन्नता आढळते. दोघाची भाषा जरी कन्नड असली तरी बोलण्याचे हेल, उच्चार, शब्दांवरील आघात किंवा अनेकदा शब्दांमध्येही फरक असतो. (पृ.क्र.६)

उत्तर कर्नाटकातील लोक मनमोकळे व सरळ असतात आणि या गोष्टीचा त्यांना अभिमान असतो. त्यांच्यात बरेचदा कुलकर्णी, देशपांडे, देसाई, पाटील अशी मराठी आडनावे आढळतात, पण ते मराठी बोलत नाही. कित्येक कुटुंबातील लोकांनी कर्नाटक राज्याची सीमारेषा ओलांडून बाहेर कधी पाऊल ही टाकलेले नसते. भांडीवाडचा हनुमान नवसाला पावतो, अशी अख्ख्या पंचक्रोशीत ख्याती आहे. धारवाडमधील शिक्षणाचा दर्जा फार उत्तम असल्याचे दिसून येते. धारवाड हे कला आणि साहित्याचे माहेरघर मानले जाते. निसर्गाने धारवाडला उत्तम, सकस जमिनीचे वरदान दिले आहे. येथील माणसेशुद्धा शांतता प्रिय, सुशिक्षित आणि सुसंस्कृत दिसून येतात, धारवाड स्वादिष्ठ पेढयांसाठी प्रसिद्ध आहे. काही घराण्यांनी महाराष्ट्रातील पेशव्यांना संकट काळात मदत केल्यामुळे त्या उपकाराची परतफेड म्हणून पेशव्यांकडून त्यांना काही जमिनी वतन म्हणून मिळाल्या होत्या. या जमीनदारांना वेगवेगळे किताब मिळालेले होते. त्यांची कालांतराने आडनावे बनली. जसी देशपांडे, जहागीरदार, इनामदार, काही काळानंतर हे जमीनदार आळसी ऐदी बनले. त्यांच्यातील कित्येक व्यसनाधीन बनले, त्यांच्या घरातील स्त्रियांना कोणत्याही बाबतीत मान वर करून बोलण्याची, मत प्रदर्शन करण्याची मुभा नव्हती. त्या उच्चकुलीन, खानदानी स्त्रियांना खाली मानेनं सर्व दडपणूक सहन करावे लागे... मग त्या स्त्रिया कोणत्याही वयाच्या असोत त्या काळचा समाज संपूर्णपणे पुरूष प्रधान होता. पितृसत्ताक कुटुंब पद्धती प्रचलित होती. कुटुंब प्रमुखाचे निर्णय घरातील प्रत्येकावर बंधनकारक असत.

स्वातंत्र्योत्तर काळानंतर मात्र भूमिहीन शेतक–यांचा प्रश्न सोडवण्याचं काम जस सुरू झालं, तशा या घराण्यांना आपल्या जमिनी गमवाव्या लागल्या. त्यांच्यापैकी कोणाच्याच अंगात स्वत:ची जमीन स्वत: करण्याची हिंमत नव्हती, ताकद नव्हती, कौशल्य नव्हते, परिणामी त्यांना गरिबीचे चटके सहन करावे लागले. ती कुटुंबे कनिष्ठ मध्यम वर्गीयामध्ये मोडू लागली. परंतू शतकानुशतके त्यांच्या धमण्यातून सत्ता आणि श्रीमंतीची ऐट वाहात होती. त्यामुळेच त्यांची वृत्ती मात्र अजूनही आत्मकेंद्रित आणि अरेरावीची होती.

'परीघ' या कादंबरीत 'आलदहळळी' या गावाचे वर्णन आलेले असून या गावामध्ये केवळ कन्नड भाषेचे सातव्या इयत्तेपर्यंत वर्ग चालायचे. तेही गावक–यांनी सरकारच्या हाता–पाया पडून सुरू करायला लावले होते. त्यानंतर इथले विद्यार्थी पुढच्या शिक्षणासाठी शिग्गाव किंवा हुबळीला जायचे. या गावात युगाधी म्हणजे गुडीपाडवा हा वर्षारंभाचा सण साजरा केला जातो. मृदुला वयात आली तेव्हा गावात माध्यमिक शाळा

बनली होती. भीमण्णाकडे ब—यापैकी शेतजमीन होती. गावात शेकडा पन्नास माणसं हिंदू आहेत, तर बाकीचे पन्नास टक्के इस्लाम धर्माचे आहेत. हनुमंताच्या देवळा समोर मशिद ही आहे. मशिदीचे मुल्ला जलालुद्दीन आणि मारूतीच्या देवळाचा पुजारी धनगर संगप्पा हे दोघे मित्र आहेत. या खेडयातील काही लोकांचा व्यवसाय मेंढीपालनाचा आहे. हनुमान जयंतीच्या दिवसाची पुजा भीमण्णा च्या हातची असते प्रत्येक संस्कृत श्लोक पवित्र मानणा—या या गावातल्या भाबडया लोकांच्या दृष्टीन ही पण एक 'महापुजा' असायची. (पृ.क्र.५)

ही पिढयानपिढया चालत आलेली पद्धत यावर गावात कधी ही मतभेद झालेले नाही. मशिदीच्या आवारात संत पीर फकीर मुल्लाची समाधी आहे. गावची माणसं त्याला 'पीर साबचा दर्गा' म्हणून ओळखतात. सगळे गावकरी वर्गणी गोळा करून वर्षातून एकदा उरूस साजरा करतात. या उरूसासाठी लांब लांबून माणसं येतात. भीमण्णाची बायको रूक्मिणीबाई सवणूरची होती. सवणूर या गावामध्ये सोवळं—ओवळं जरा जास्त असल्याचे दिसून येते. तिथे मठ—पुजा—व्रत—वैकल्य यांचा प्रभावही जास्त आहे. कृष्णा बीएस. सी. करेपर्यंत दमून गेला होता. 'उत्तमशेती' मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी' म्हणत त्यांनं शेती करणं पसंत केलं. लग्न प्रथा ही पत्रिकेनुसारचं होता ना दिसून येते. सरलाचा जन्म मुळ नक्षत्रातील असल्यामुळे सासरा नसलेलं घर असावं. म्हणून तसे स्थळ शोधले जाते. रत्नम्मा किरकोळ शेतीसोबतचं दुकानदारी व व्याजी पैसे देण्याचा धंदा करते. मृदुला आपला पती डॉक्टर संजयला परोपरीन मदत करते परंतू पैसा आल्यावर मात्र संजय फार बदलून जातो. त्यांच्या अंतर्यामी दडलेले गुण—अवगुण बाहेर आल्याचं समजल्यावर ती मनोमन होरपळून जाते. आपलं दु:ख कुणाशीही वाटून न घेतल्यामुळे मनोरूग्ण होते. मानसोपचार तज्ज्ञानाच्या सल्ल्यानेचं पैसा, पती, मुलगा या प्रांपचिक सुखाचा त्याग करून आलदहळळीला निघून जाते.

'पितृऋण' या कादंबरीत व्यंकटेश व त्यांची पत्नी शांता ही अतिशय श्रीमंत कुटुंबातील असून त्याचा मुलगा रवी हा सॉफ्टवेअर इंजिनीअर तर मुलगी एम.बी.बी.एस ला आहे. व्यंकटेश हे एस.बी.आय बॅकेत मॅनेजर या पदावर कार्यरत होते. वास्तविक पाहता त्यांना नोकरीची काहीही गरज नव्हती. शिग्गावी कोणत्याही प्रकारचं कार्यक्रम असले तर पत्रिका छापून घेतले जात नाही. घरोघरी जाऊन आमंत्रण दिल की झालं. गावात एकच मोठी गल्ली होती. अनंत पाटलंचे कुटुंब पुरूषप्रधान असल्याचे दिसून येते. त्यांच्या घरातील बायकांना स्वयपाकांशिवाय दुसर काहीच करता येत नाही. शंकर शिशुनाळच्या कन्नड शाळेत मास्तर होते त्यांना तीन मुली होत्या. तो व त्यांचा परिवार अतिशय गरिबीमध्ये दिवस काढत होतो मोठया मुलीच्या कुंडलीत मूळ नक्षत्र होता म्हणून तिला सास—याशिवाय घर हवं होत. स्थळ मिळाल तर मुलाला वर दक्षिणा देण्याची त्यांची ऐपत नव्हती. त्यांच्या तिन्ही मुली खुप हुशार होत्या. पण परिस्थिती अभावी त्यांना उच्च शिक्षण देता येत नाही. हुबळीतील दिवठे चाळीतील समाजजीवनाचे वर्णन कादंबरीत आले आहे. चाळीत शिरायचे म्हणजे कठीणचं काम होते लहान कंपाऊंड, त्यात एकाच ओळीत चार शौचालय तिथ दहा बारा कुटुंबे राहत होती. जुनी, रंग नसलेली मातीची भिंत किती वर्षापासून तशीच होती कोण जाणे! पत्र्याच्या दाराचे न्हाणी घर एका घरातल बोलण दुस—या घरात ऐकू यायचं. (पृ.क्र.२८) शंकरची आई भागिरथी हिच्या जीवनाविषयी सांगतांना लेखिका सांगतात. भागिरथी ही अनाथ मुलगी होती. तिच्या कुंडलीत आश्लेषा नक्षत्र म्हणजे मोठा दीर नसलेल घर हवं होत. वयाच्या सोळाव्या वर्षीच तिच लग्न होत. पंधरा दिवसाचा पतीचा सहवास, हाच तिच्या आयुष्यातील संसार सुखाचा काळ होता. त्या काळाचं वातावरण कर्मठ होतं. त्यातून शुर्पाली सारख्या खेडयात, कर्मठ लोकांच्या ब्राम्हण वस्तीत सोवळही कडक होत. नुकतीच बाळंत झालेली सोळा वर्षाची भागव्वा मनात

नसूनही सामाजिक दृष्टीला बंदिस्त झाली होती. तिला केशवपन कराव लागल होत. घराचा उंबरठा ओलाडण किंवा कोणाशी बोलण निषिद्ध होत. पूजेच्या वेळी, मंगलप्रसंगी तिच तोंड पाहणं ही अमंगल होत. तरूण भागिरथी ही सगळयासाठी अपशकुन, अपकीर्ती, अपमान झालेली होती. अशाही परिस्थितीत ती लोकाकडे काम करून शंकरला शिकविते, आपल्या पतीवरील श्रद्धा कायम ठेवून त्याचं निष्ठेने दरवर्षी त्यांचा श्राद्ध करते.

'हरविलेल्या मंदिराचे रहस्य' या कादंबरीत सोमन हळळी या खेडेगावातील समाज जीवनाचे वर्णन आलेले आहे. डॉ. शेखर यांचे वडील गावाच्या देवळाचे विश्वस्त आहेत. गावात कधीही कुणाकडे लग्नकार्य असलं, की त्यांना लोक सन्मानानं निमंत्रण देतात. त्यांची शेती आणि नारळाची बाग आहे. गावातीलचं मजुरांना ते कामावर बोलवतात. त्यामुळे गावक—यांना रोजगार मिळतो. उत्पन्नाचा बराचशा भाग ते देवळाला देतात. त्यांच्या बागेत पिकलेली फळे ते गावातल्या मुलांना मोफत वाटून टाकतात.

गावातील लग्नात लाडू, लोणची, पापड, चटणी शिवाय फराळाचे पदार्थ, चहा कॉफी हे सर्व साहित्य तयार करण्यासाठी गावातील स्त्रिया—पुरूष एकत्र येऊन सहकार्य करतांना दिसून येतात. आजीच्या बागेत अनेक औषधी जन्य रोपटे लावलेले असतात. गावातील सर्व लोक या नैसर्गिक औषधीचा वापर करतात. पाय—याच्या विहिरीचा जेव्हा शोध लागतो तेव्हा गावातील स्त्रिया—पुरूष व मुलेही आपआपल्या परीनं मोफत सहकार्य करतात. गावातील सर्व लोक उत्खननात सहभागी होतात. उत्खनानात सहभागी झालेल्या सर्व गावक—यांच्या जेवणाची व्यवस्था आजोबा स्वत:तर्फे करतात. रान, प्राणी, पक्षी, झाड, झुडप, फुल, पान या सगळयाविषयी अनुष्काला या खेडेगावात कितीतरी शिकायला मिळाल होत.

उत्खननात सहभागी झालेल्या मंडळीचे आभार व्यक्त करण्यासाठी गावात आजोबा निरोप समारंभाचे आयोजन करून स्वत:तर्फे त्यांना बक्षीस देतात. लहान मुलाच्या जिद्दीमुळे व साहसी वृत्तीमुळे एका अद्‌भुत, अकल्पित वास्तुचा शोध लागतो. केंद्रीय शिक्षण मंत्रीसुद्धा गावक—याच्या कार्याची दखल घेऊन या ऐतिहासिक वास्तूसाठी अंदाजपत्रकामध्ये खास निधीची तरतुद करतात. या कादंबरीत ग्रामीण समाज जीवनातील साधेपणाचे, निसर्गाशी येणा—या सहवासाचे आणि सकारात्मक परंपरेचे दर्शन घडते.

**निष्कर्ष :**

१. कादंबरीत शहरी परिसरासोबतच ग्रामिण परिसराचेही वर्णन येते.

२. कादंबरीत 'स्त्रियांची दु:खे' हा विषय मांडला आहे.

३. कादंबरीत मानवी मूल्याची जपवणूक केली आहे.

४. कार्पोरेट एरियातील माणसाच्या जीवनावर प्रकाशझोत टाकला आहे पण सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवला आहे.

५. कादंबरीची भाषा सुसंस्कृत व नागरी आहे.

६. कादंबरीतून सामाजिक प्रश्नांची मांडणी केली आहे, समाजातील ज्वलंत प्रश्न वाचकासमोर आणून त्यातून कसा मार्ग काढावा, याविषयी मार्गदर्शन केले आहे.

७. समाजातील मनोरूग्ण बनणा—या महिलांना या कादंबरी वाचनातून जीवनाचा मार्ग स्वत:च कसा बदलायचा, याची जाणीव करून दिली आहे.

८. कादंबरीतून पैशामुळे बदलणा—या मानवी संबंधाचे दर्शन घडविले आहे.

९. पैशामुळे माणसाच्या अंतरंगात दडलेले गुण—अवगुण वर्तनातून कसे दिसतात, त्या मानवी प्रवृत्तीचे दर्शन घडविले आहे.

१०. समाजातील कोडग्रस्तांना 'महाश्वेता' कादंबरीतून दिलासा दिला आहे.

११. कुटुंबातील व्यक्तीचे एकमेकांशी असलेले नाते जिव्हाळयाचे असते, मग ते नाते रक्ताचे असो वा नसो. या गोष्टीची जाणीव 'अस्तित्व' कादंबरीतून करून दिली आहे.

१२. कादंबरीतून भारताच्या विविध भूभागासोबतच समाजदर्शन ही घडते.

१३. सुधा मूर्तीच्या कादंबरीतून भारतीय कुटुंबव्यवस्थेची माहिती होते.

१४. कादंबरी वाचनातून आमुलग्र परिवर्तन घडवून वाचकांना संपन्न, समृद्ध आणि परिपक्व बनविण्याचे सामर्थ्य सुधा मूर्तीच्या लेखनात आढळते.

**संदर्भ टिपा :**


- मूर्ती सुधा, अनुवाद प्रा. ए.आर.यार्दी 'अस्तित्व', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, २६ एप्रिल २००२,पृ.क्र २५.
- तत्रैव – पृ.क्र. २७
- मूर्ती सुधा, अनुवाद उमा.वि.कुलकर्णी 'डॉलर बहू', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर २००३, पृ.क्र ११.
- तत्रैव –पृ.क्र. १७
- तत्रैव – पृ.क्र. ५४
- तत्रैव – पृ.क्र. १२१
- मूर्ती सुधा, अनुवाद उमा. कुलकर्णी 'महाश्वेता', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, ऑगस्ट २००२, पृ.क्र १८.
- मूर्ती सुधा, अनुवाद लीना सोहोनी,'बकुळा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, ऑगस्ट २००९, पृ.क्र ६.
- मूर्ती सुधा, अनुवाद उमा वि कुलकर्णी, 'परीघ', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, ४ नोव्हेंबर २०१३, पृ.क्र ५.
- मूर्ती सुधा, अनुवाद मंदाकिनी कट्टी, 'पितृऋण' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, आक्टोबर २००९, पृ .क्र २८.
- मूर्ती सुधा, अनुवाद लिना सोहोनी, 'हरवलेल्या मंदिराचे रहस्य' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती...... पृ.क्र. २५